सेवावर्धिनी

# वार्षिक अहवाल
# २०२० - २१

## सेवावर्धिनी

३९० ब – नारायण पेठ, दत्तधाम, पुणे ४११०३०

०२०- २४४३३६०६, २४४९९६०६

इमेल – CONTACT@SEVAVARDHINI.ORG

# प्रास्ताविक



भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, सेवावर्धिनीचा रौप्य महोत्सव आणि सेवा कार्यात अग्रणी असलेल्या रा. स्व. संघाचा शतक महोत्सव या अगदी नजीकच्या काळात येणाऱ्या मोठ्या घटनांच्या पार्श्वभूमीवरच - हे कार्यवृत्त.

कोरोना २०१९मुळे उद्भवलेल्या विविध समस्या, समाजाने दाखवलेला संयम आणि धीरोदात्तपणा, दातृत्व, माणुसकीचे दर्शन यामुळे या समस्या न राहता समाजसेवेच्या उत्तम संधीच ठरल्या. कामाची क्षेत्रे विस्तारली. आत्तापर्यंत न हाताळलेले विषय हाताळता आले. सर्व प्रकारची काळजी घेऊन सेवावर्धिनीच्या कार्यालयातील सर्व सहकारी आपापल्या भागात विविध सेवाकार्यात सक्रीय सहभागी होते. सेवावर्धिनीने केलेल्या मदतीच्या आवाहनाला देखील समाजाने उत्तम प्रतिसाद दिला.

किराणा कीट वाटप, सेवा दिवाळीसारखे उपक्रम यातून राबविता आले.

वाढते कार्यक्षेत्र म्हणजे कार्यक्षमतेला आव्हानच, हे ही आव्हान आपल्या सर्व सहकाऱ्यांनी समर्थपणे पेलले. यासाठी ते प्रशंसनेस पात्र ठरले आहेत.

आपल्या विविध प्रकल्पांच्या देणगीदार संस्था, वैयक्तिक देणगीदार, आपल्या सर्व बँका, शासकीय कार्यालये यांचेही सहकार्य उल्लेखनीय होते. या सर्वांचे मनापासून आभार..!!

सोमदत्त पटवर्धन

कार्यवाह, सेवावर्धिनी



सेवावर्धिनीची स्थापना १९९८ साली झाली. सेवावर्धिनी ही नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असून अन्य सेवासंस्थांना पूरक सेवा देण्याचे काम करत आहे. आरोग्य, शिक्षण, स्वावलंबन, सामाजिक संघटन, ग्रामविकास, जलसंधारण, कृषी या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या देशभरातील विविध संस्थांना नोंदणी व संस्था संचालन, अहवाल, प्रकल्प लेखन (Project writing), विकासाच्या विविध विषयांवरील माहितीच्या कार्यशाळा, शासकीय योजनांची सांगड, अशा अनेकविध सेवा व मार्गदर्शन गेल्या २३ वर्षांपासून देत आहे.

सेवावर्धिनीचे कार्यकर्ते अनेक सामाजिक प्रश्नांशी संबंधित प्रकल्पावर काम करत आहेत. हे प्रकल्प योग्य पद्धतीने पूर्ण करण्यासाठी सर्वेक्षण, प्रश्नांची निश्चिती करून त्यावर उपाययोजना ठरवणे, विषयाशी निगडीत तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे, तांत्रिक सहाय्य उपलब्ध करणे, प्रकल्प राबवण्यासाठी रचना करणे इ. कामे सेवावर्धिनी करते. सामाजिक प्रश्नांची जाणीव व ते प्रश्न सोडवण्यासाठीची तळमळ असणारा मोठा स्वयंसेवकांचा गट समाजात आहे केवळ त्यांच्या सहकार्यानेच हे व असे अनेक प्रकल्प यशस्वी करणे सेवावर्धिनीस शक्य झाले आहे.

### ध्येय

- ध्येयप्रेरित व समर्पित कार्यकर्ते आणि सामाजिक संस्थांच्या सामुहिक प्रयत्नांमधून बलशाली समाज उभा करणे.

### ध्येयपथ

- सेवाक्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे सबलीकरण करणे.
- सामुहिक प्रयत्नांमधून विकासोन्मुखी कार्यक्रमांच्या आधारे व्यापक सामाजिक उत्कर्षासाठी प्रयत्न करणे.
- लोकसहभागातून सामाजिक विश्वासाचे वातावरण निर्माण करणे.

### उद्दिष्टे

- सामाजिक विकासाच्या माध्यमातून लक्षावधी देशबांधवांचा जीवनस्तर उंचावण्यासाठी, त्यांच्या प्रश्नांवर व्यवहार्य उपाय योजना अमलात आणण्यासाठी स्वयंस्फुर्तीने प्रत्यक्ष काम करणाऱ्या सेवा संस्थाना प्रोस्ताहित व मदत करणे.

### मूल्ये


- पूर्ण समर्पित व ध्येय प्रेरित होऊन काम करणे
- पारदर्शकता
- आधुनिक व व्यावसायिक दृष्टीकोन

राष्ट्रीय एकता व समरसता

वंश, पंथ, जात, धर्म, रंग, वय, लिंग व शिक्षण निरपेक्षता

सर्व वैधानिक व कायदेशीर गोष्टींची पूर्तता

# सेवावर्धिनीची रचना




**मानद अध्यक्ष**

मा. श्री. प्रमोद जी चौधरी
संस्थापक व कार्यकारी अध्यक्ष प्राज इंडस्ट्रीज लि.

**विश्वस्त मंडळ**

मा. डॉ. उपेंद्र कुलकर्णी
मा. तुकाराम नाईक
मा. किशोर देसाई
मा. सोमदत्त पटवर्धन

| | |
|---|---|
| श्री. किशोर देसाई | कार्याध्यक्ष |
| श्री. अनिल व्यास | सहकार्यवाह |
| सौ. माणिक दामले | सहकार्यवाह |
| श्री. जयंत काकतकर | कोषाध्यक्ष |
| सौ. पद्मा कुबेर | कार्यकारिणी सदस्य |
| श्री. योगेश्वर गर्गे | कार्यकारिणी सदस्य |
| श्री. प्रमोद कुलकर्णी | निमंत्रित सदस्य |

| | |
|---|---|
| श्री. सोमदत्त पटवर्धन | कार्यवाह |
| श्री. प्रशांत मोराणकर | सहकार्यवाह |
| श्री. विवेक भागवत | सहकार्यवाह |
| श्री. चंद्रशेखर कुलकर्णी | कार्यकारिणी सदस्य |
| श्री. जयराम फणसळकर | कार्यकारिणी सदस्य |
| श्री. देवदत्त टेंभेकर | कार्यकारिणी सदस्य |
| श्री. उदय कुलकर्णी | कार्यकारिणी सदस्य |
| श्री. श्रीराम पटवर्धन | कार्यकारिणी सदस्य |





सेवावर्धिनी



संस्था सक्षमीकरण





अभिनव प्रकल्प



जलदूत प्रकल्प – मध्यावधी मूल्यांकन – क्षेत्र भेट - गुहिणी, ता. वेल्हे, जि. पुणे

# प्रमुख आयाम


PRA, सर्वेक्षण
अभिलेखन (Documentation)
संस्था सक्षमीकरण - पूरक सेवा
मूल्यांकन (Evaluation)
संसाधन उभारणी (Resource Mobilization)
संस्था संचालन प्रशिक्षण


ग्राम विकास
जल संधारण
उपजीविका
अभिनव प्रकल्प
उर्जा
महिला सक्षमीकरण
अरुणोदय

# संस्था सक्षमीकरण – online – सत्र

- प्रकल्पाचा उद्देश –

> सामाजिक संस्थांना संस्था संचालनामध्ये कार्यशाळेद्वारा मदत करणे

विविध सामाजिक संस्थांचे सक्षमीकरण हे सेवावर्धिनीचे मुख्य काम आहे. संस्था संचालन संदर्भात महत्वाच्या विषयांच्या प्रत्यक्ष कार्यशाळा सेवावर्धिनी आयोजित करते.

कोविड आणि lockdown मुळे आलेल्या बंधनांमुळे यावर्षी online कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेची योजना १२ महिने १२ विषयांवर सत्रे अशी केली होती. दर महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी सकाळी १०.३० ते १२.३० या वेळात online सत्राची योजना केली. प्रत्येक सत्रापूर्वी अभ्यास / पूर्वतयारी करणे आणि सत्रानंतर पाठपुरावा म्हणून अभ्यास / काम करणे अपेक्षित होते.

योजना सुरु होण्यापूर्वी सर्व संस्थांसाठी induction सत्र घेण्यात आले. त्यानंतर या आर्थिक वर्षात ७ सत्रे झाली आहेत. २०२१ – २२ या आर्थिक वर्षात अन्य सत्रे होणार आहेत.

गुगलफॉर्म द्वारे २० जिल्ह्यातील ३६ संस्था / व्यक्तींनी या कार्यशाळेसाठी नोंदणी केली आहे.

सत्रांचे विषय -

1. धर्मादाय आयुक्तालय – रचना आणि online पद्धती
2. हिशोब व्यवस्थापन
3. प्रकल्प प्रस्ताव आणि अहवाल लेखन
4. Admin – Office management
5. प्रकल्प कुठले करावेत आणि कसे सुचतात?
6. प्रकल्प नियोजन आणि व्यवस्थापन
7. कार्यक्षेत्राचा परिचय, अभ्यास व प्रश्न
8. Soft skills
9. Social media
10. Talent management
11. संस्था बांधणी
12. समारोप



प्रिसिजन फौंडेशन

* प्रिसिजन फौंडेशनने या योजनेसाठी काही प्रमाणात आर्थिक योगदान केले आहे.

➢ प्रकल्पाचा उद्देश –

उपलब्ध स्थानिक संसाधनांच्या माध्यमातून ग्रामकेंद्रित रोजगार निर्मिती करणे

संपर्क, प्रशिक्षण, कौशल्य विकास, तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन, समुपदेशन, कार्यानुभव या माध्यमातून यशस्वी उद्योजक उभा करणे.

विविध योजनांच्या उपलब्धीसाठी व उद्योग उभारणीसाठी मदतीचा हात देणे

उपजीविकेसाठी शहराकडे होणारे स्थलांतर रोखणे

प्रकल्पाची योजना -





* EDP – Entreprenuership Development Program

➢ कोविडच्या पार्श्वभूमीवर मदतकार्याबरोबर दीर्घकालीन करण्याचे काम म्हणून जुलै २०२० पासून स्वावलंबन अभियानाची सुरुवात झाली.

➢ संपर्क, प्रशिक्षण, कौशल्य विकास, तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन, समुपदेशन आणि कार्यानुभव या माध्यमातून यशस्वी उद्योजक तयार करण्यासाठी प्रयत्न करणे असे काम सुरु झाले आहे.

| | |
|---|---|
| प्रांतातील सहभागींची नोंदणी | २२२८ |
| उद्योजकता परिचय वर्ग उपस्थिती | ९७६ |
| परिचय वर्ग - प्रतिक्रिया पत्र पाठवलेले सहभागी | २३६ |

| जिल्हा | नोंदणी |
|---|---|
| नाशिक | ३१६ |
| नगर | ३६१ |
| कोल्हापूर | ३३४ |
| सातारा | १८६ |
| सांगली | १२१ |
| सोलापूर | ३१९ |
| पुणे | ६५१ |
| | २२८८ |






हिंदुस्थान जागरण

डॉ. हेडगेवार स्मारक सेवा निधी

- याच योजनेंतर्गत **जागतिक महिला दिना**च्या निमित्ताने 'ग्रामीण स्त्री शक्ती संस्थेच्या' सहयोगाने गोमेवाडी ता. आटपाडी, जि. सांगली येथील महिलांसाठी ४ तासांचा **मधमाशी पालन उद्योग जनजागृती कार्यक्रम** घेण्यात आला.
- या कार्यक्रमामध्ये 'सेन्ट्रल बी रीसर्च अँड ट्रेनिंग इंस्टीट्युट (CBRTI)' चे अधिकारी श्री. पोखरे यांनी मधमाशी पालन उद्योगाबद्दल मार्गदर्शन केले.

सहभागी महिला
७५

सेवावर्धिनी

- दे आसरा फौंडेशन
- भारतीय युवा शक्ती ट्रस्ट
- पुणे मॅनेजमेंट असोसिएशन
- कस्तुरबा महिला खादी ग्रामोद्योग आयोग (स्किल ट्रेनिंग आणि EDP)
- ज्ञानदा इन्स्टिट्यूट
- ग्रामीण स्त्री शक्ती

<u>बालेघर ता. वाई जिल्हा सातारा येथील पाणी साठवण टाकीचे पुनरुज्जीवन</u>

➢ प्रकल्पाचा उद्देश

गावातील नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी

मार्च २०१९ ते मार्च २०२१ या कालावधीमध्ये सातारा जिल्ह्यातील बालेघर, ता. वाई येथे शिवकालीन विहिरीची दुरुस्ती व पुनर्बांधणीचे काम केले. तसेच तेथे सौरपंप बसवला.



Atlas Copco ॲटलास कॉप्को, बेल्जियम

एकूण लाभार्थी संख्या
९००







❖ COVID १९ – Lockdown मुळे हे काम मागील आर्थिक वर्षात पूर्ण होऊ शकले नाही.

## पालाणे ता. वाई जिल्हा सातारा येथील नवीन पाणी साठवण टाकीचे बांधकाम

➢ प्रकल्पाचा उद्देश –

गावातील नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी

मार्च २०१९ ते मार्च २०२१ या कालावधीमध्ये ता. वाई, सातारा जिल्ह्यातील पालाणे या मांढरदेव गावाच्या वस्तीवर सिमेंट कॉंक्रीटच्या १५ लाख लिटर पाणी साठवण क्षमता असलेल्या टाकीची बांधणी



ऑईल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन लि.

एकूण लाभार्थी संख्या २००









# जलदूत

➢ प्रकल्पाचा उद्देश –

माती , पाणी अश्या नैसर्गिक साधन संपत्तीच्या विषयांमध्ये जलदूतांस प्रशिक्षण देणे आणि सक्षम बनवणे

निवडलेल्या सर्व गावांमध्ये 'ग्रामस्तरीय पाण्याच्या सुरक्षितता आणि शाश्वतता आराखडा'( VWSSP) बनविण्याकरिता क्षेत्रीय मार्गदर्शन व सहाय्य करणे


पिण्याच्या पाण्याच्या सुरक्षितते संदर्भात गाव पातळीवर योजिले गेलेले जलसंधारणाचे काम (इंटरवेंशन) विकसित करण्यास मदत करणे.

गाव पातळी वरील केलेले अन्य नियोजन व कृती आराखडे यांस सहाय्य करण्यासाठी संभाव्य मार्गांबद्दल जागरूकता निर्माण करणे (जसे की सरकारी योजना, संपर्कातील इतर संस्था , सामाजिक दायित्व निधी पुढाकार इत्यादी)








सन २०२०-२१ मध्ये

- टप्पा २ मधील २ प्रशिक्षणे घेण्यात आली
- टप्पा ३ मध्ये ऑफलाईन सर्वेक्षण, निरीक्षणे, नोंदणी, अहवाल आणि त्यांचे ऑनलाईन व्यवस्थापन करण्यात आले.
- टप्पा ४ मधील कामे कोविड संक्रमणामुळे संथ गतीने सुरू कण्यात आली आहेत.

| | |
|---|---|
| सहभागी गावे | 25 |
| सहभागी संस्था | 21 |
| जलदूत संख्या | 43 |
| एकूण लाभार्थी कुटुंबे | 9719 |
| एकूण लाभार्थी लोकसंख्या | 49244 |
| प्रकल्पातील गावे, जलदूत, सहयोगी संस्था, सेवावर्धिनी कर्मचारी, तज्ञ मंडळी याची माहिती प्रकल्प ड्राईव्ह वर उपलब्ध आहे . लिंक : https://tinyurl.com/Sevajaldoot2Datasheet | |

| उपक्रम | उपक्रमाची थोडक्यात माहिती |
|---|---|
| PRA अहवाल संकलन आणि दस्त ऐवजीकरण | गाव जलदूत आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील विद्यार्थी यांच्याकडून झालेल्या सर्वेक्षणाचे अहवाल मराठी भाषेत संकलित केले. त्यांचे प्रमाणबद्ध विदासंकलन आणि निष्कर्ष मांडून सर्व गावांचे अहवाल online प्रकाशित केले आहेत . |
| जागतिक पर्यावरण दिन | दि. ५ जून २०२० रोजी online संवाद बैठकीचे आयोजन.<br>या कार्यक्रमासाठी सहयोगी संस्थांचे प्रतिनिधी आणि जलदूत उपस्थित होते.<br>महाराष्ट्र वृक्ष संवर्धिनी संस्थेचे वरिष्ठ विकास सल्लागार आणि सेवानिवृत्त वनाधिकारी श्री. माधव गोगटे यांनी मार्गदर्शन केले.<br>पर्यावरण दिनानिमित्त प्रकल्पांतर्गत ३७५२ झाडे लावली. |
| जलसंधारण | २५ पैकी १३ गावांनी कोविड संक्रमण काळात विहीर गाळ काढणे, बंधारा दुरुस्ती, विहीर आणि तलाव खोलीकरण, जैविक खत बनवणे इ. कामे केली.<br>अधिक माहिती साठी लिंक<br>https://tinyurl.com/SevaJaldoot2Vupdate |
| ऑनलाईन पोर्टल्स | पाऊस आणि विहिरींच्या निरनिराळ्या नोंदी ठेवण्यासाठी ३ गूगल फॉर्म्स द्वारे माहिती गोळा केली.<br>१. पर्जन्यमान नोंदणी पोर्टल - https://forms.gle/tUdErE8A3CGp3AnL6<br>२. विहीर सर्वेक्षण पोर्टल - https://forms.gle/S1E5mGPBmYGG5yCP9<br>३. विहीर पाणी पातळी पोर्टल - https://forms.gle/HcAxvX5EMFLohko19<br>या मध्ये मिळालेल्या नोंदींचे ऑनलाईन माहिती दर्शक पोर्टल बनवले गेले. यामध्ये सर्व २५ गावांचा जमा झालेला पाऊस त्याचे वारंवारिता, विहीर नोंदणी आणि माहिती तसेच पाणी पातळी आलेख यांचा समवेश आहे. |

| | |
|---|---|
| क्षमता प्रगल्भता शिबीर | कोविड -१९ संक्रमण काळात संचारबंदी असताना घर बसल्या ऑनलाईन पद्धतीने १९ ऑगस्ट ते १८ सप्टेंबर २०२० या कालावधीत जलदूतांचे ५ सत्रात प्रशिक्षण झाले. सेवावर्धिनीच्या कार्यकर्त्यांनी यामध्ये निरनिराळे विषय मांडले.<br>१. डिजीटल साक्षरता<br>२. आर्थिक साक्षरता<br>३. दस्तऐवजीकरण<br>४. वाचन,मनन , आकलन<br>५. संभाषण कौशल्य |
| आर्थिक सामाजिक सर्वेक्षण फॉर्म विकसित करणे | कोबो डेटा सर्वर आणि Web form coding structure चा वापर करून ऑनलाईन-ऑफलाईन पद्धतीने चालणारा सर्वेक्षण फॉर्म तयार करण्यात आला.<br>https://ee.kobotoolbox.org/x/7lD2ltnE |
| VWSSP प्राथमिक बैठका | ऑक्टोबर –डिसेंबर २०२० या कालावधीमध्ये गाव पातळीवर 'पाण्याच्या सुरक्षितता आणि शाश्वतता आराखडा' समजून घेण्यासाठी प्राथमिक बैठका घेण्यात आल्या.<br>पाण्याचे अंदाजपत्रक तयार करणे, मृदा आणि जलसंधारणाचे उपाय, पाणी व्यवस्थापन आणि नियोजन या संदर्भात कृती आराखडा तयार करणे असे बैठकीचे स्वरूप होते.<br>सर्व गावांसोबत २२ ऑनलाईन तर ५ प्रत्यक्ष बैठका घेवून अहवाल तयार करण्याबाबत मार्गदर्शन केले. |
| प्रकल्प मध्यावधी मूल्यांकन | श्री. युगंधर मांडवकर या तज्ञांच्या देखरेखीखाली व श्री. अभिजित पाटील (ACCF) यांच्या समवेत दि. २१ ते २४ डिसेंबर या कालावधीत प्रकल्पाचे मध्यावधी मूल्यांकन झाले. यामध्ये प्रकल्पातील तज्ञ मंडळी, सहाय्यक, कार्यकर्ते आणि गावपातळीवरील जलदूत यांसमवेत चर्चा झाली.<br>प्रकल्पाचे उद्देश, दृष्टीकोण, प्रकिया सुलभता उपक्रम, विदासंकलन आणि दस्त ऐवजीकरण, क्षेत्रीय भेट, आर्थिक अंमलबजावणी तसेच पुढील वाटचालीकरिता मार्गदर्शक सूचना तज्ञांनी दिल्या. |
| इंटर्नशिप | पुणे विद्यापीठ, भूमाहितीशास्त्र विभागाचे पदव्युत्तर शाखेचे ३ विद्यार्थी शेवटच्या सत्राकरिता जलदूत २.० प्रकल्पात जानेवारी ते एप्रिल २०२१ या कालावधीसाठी सेवावर्धिनीशी जोडले गेले. प्रकल्पांतर्गत विहीरींच्या पाणी पातळीचे नकाशे तयार करण्यासाठी या तिघांनी मदत केली. |
| सहयोगी संस्था बैठक | दि. १३ जानेवारी २०२१ रोजी प्रकल्पातील सर्व सहयोगी संस्थांची पुणे येथे बैठक आयोजित केली.<br>सर्व गावांची प्रकल्पातील सद्यस्थिती, जलसंधारणाची पुढील कामे करण्याबाबतचे मार्गदर्शन याविषयी या बैठकीत चर्चा झाली.<br>२० संस्थांचे प्रतिनिधी या बैठकीसाठी उपस्थित होते. |
| VWSSP तसेच प्रत्यक्ष कामाकरिता क्षेत्रीय भेटी | विदर्भ, मेळघाट, खानदेश आणि पश्चिम महाराष्ट्र पट्ट्यातील २० गावांना क्षेत्रीय भेटी देण्यात आल्या.<br>भेटींचा उद्देश -<br>१. जलदूत आणि सहयोगी संस्थेबरोबर सद्यस्थिती मधील उपक्रमांची चर्चा करणे<br>२. गाव बैठक आयोजित करून जल व्यवस्थापन समिती स्थापन करणे<br>३. अहवाल लिहिण्याबाबत मार्गदर्शन VWSSSP<br>४. प्रकल्पांतर्गत गावामध्ये होणाऱ्या जलसंधारण कामाची दिशा ठरवणे |
| प्रशिक्षण ५वे –नेट प्लानिंग, ड्रेनेज लाईन | प्रकल्पातले ५वे निवासी प्रशिक्षण जे. पी. नाईक शैक्षणिक आणि विकास केंद्र, IIE कॅम्पस, पुणे येथे दि. २३ ते २७ फेब्रुवारी २०२१ दरम्यान आयोजित केले. |

| | |
|---|---|
| सर्वे आणि डीपीआर | • यामध्ये श्री. शिरीषजी तेरखेडकर आणि सर्वेक्षण क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन मिळाले.<br>• प्रशिक्षणाला ५९% उपस्थिती होती.<br>• पुण्याजवळच्या धामारी येथे क्षेत्र भेट व प्रात्यक्षिक सत्र आयोजित केले होते. |
| इंटरवेंशन | १३ गावांचे जल व मृदा संधारणाचे काम सदर मान्सूनपूर्व हंगामात करण्याचे ठरवले. याकरिता संस्था , जलदूत व जल व्यवस्थापन समिती यांचं समवेत चर्चा करून या कामाची पुढील दिशा ठरवली गेली. त्यानुसार कोणते काम निश्चित करायचे ते ठरवणे , त्यानुसार अंदाजपत्रक बनवणे , परवानगी पत्र मिळवणे अशी प्राथमिक कामे सुरु केली आहेत. |
| जागतिक जल दिन उपक्रम २२ मार्च २०२१ | जागतिक जल दिनानिमित्त प्रकल्प जलदूत २.० अंतर्गत 'ऑनलाईन कीर्तन' आयोजित केले होते. नागपूरच्या कीर्तनकार सौ. स्मिता आजेगावकर यांनी **'ग्रामीण जल व्यवस्थापन आणि वापर: अवघे धरू सुपंथ'**<br>या विषयावर तासभर कीर्तनाचा online कार्यक्रम झाला. याचे थेट प्रक्षेपण सेवावर्धिनीच्या फेसबूकपेज वर केले गेले.<br>कार्यक्रमाच्या रेकॉर्डिंगसाठी लिंक :<br>https://tinyurl.com/SevaWWD21Kirtna<br>त्याचबरोबर या निमित्ताने गावपातळीवर पाण्याच्या ताळेबंदाचे पोस्टर लावणे व ग्रामस्थांना समजावून सांगणे, जलपूजन, चित्रकला स्पर्धा, जलस्त्रोत स्वच्छता असे विविध उपक्रम राबवले गेले. |



Atlas Copco

Atlas copco





## “ग्रीन स्वीच” - सोलर ग्रीड

- प्रकल्पाचा उद्देश –

ज्या वाड्या वस्त्यांवर वीज पोहोचलेली नाही, अशा ठिकाणी सोलर ग्रीड मार्फत वीज उपलब्ध करून देणे.



TATA CAPITAL
Count on us
टाटा कॅपिटल

रायगड जिल्ह्यातील ५ वाड्यांवर काम चालू, पैकी सुळेवाडी, अरकसवाडी – पिरकडवाडी या तीन वाड्यांवर हा प्रकल्प पूर्ण झाला आहे.

सेवावर्धिनी — ग्राम उर्जा

एकूण लाभार्थी संख्या
५४ कुटुंब








# सिमेन्स गमेसा सोकर लीग (SGSL)

➢ प्रकल्पाचा उद्देश –

सिमेन्स गमेसा, जत कंपनी कार्यक्षेत्राच्या गावातील शालेय विद्यार्थी व विद्यार्थीनीना फुटबॉल खेळाचे प्रशिक्षण देणे.

समाजातील जबाबदार नागरिक बनण्यासाठी आवश्यक ते संस्कार करणे.

कार्यक्षेत्र – सांगली जिल्ह्यातील – जत तालुक्यातील ९ गावे.




- जीवन कौशल्य प्रशिक्षण– एप्रिल ते जुलै या कालावधीत सर्व सहभागींसाठी ४ Online सत्रे झाली. यामध्ये प्रशिक्षक ज्ञानू कांबळे यांनी चांगल्या सवयींबद्दल संवाद साधला.
- कोविड मदतकार्यात सहभाग –जून व जुलैमध्ये या प्रकल्पात काम करणाऱ्या ३ सदस्यांच्या टीमने मदतकार्यात सक्रीय सहभाग घेतला.
- गृह भेटी – ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात टीमने विद्यार्थी विद्यार्थीनींच्या घरी जाऊन त्यांची व कुटुंबियांची विचारपूस केली. या भेटीमध्ये नियमित अभ्यासाची व व्यायामाची चौकशी केली. तसेच पालकांना त्यांच्या रोजच्या कामात मदत करण्याबाबत सल्ला दिला.




मैदानवरील सत्रे
१२४



# दिशा

➢ प्रकल्पाचा उद्देश –

गावातील नागरिकांना उपजीविकेच्या काही संधी उदा.: कुक्कुटपालन, शेळीपालन, परसबाग, बॉयोगॅस उपलब्ध करून देणे

गावात आरोग्य विषयक जनजागृती करणे व आरोग्य शिबिर भरविणे

उस्मानाबादमधील २४ गावे आणि जत जि. सांगलीमधील १० गावांतील सरकारी रुग्णालयात आवश्यक त्या वैद्यकीय उपकरणांची मदत करणे.



SIEMENS Gamesa RENEWABLE ENERGY सिमेन्स गमेसा, स्पेन



१. परसबाग - कुटुंबातील सदस्यांना चांगला पोषण आहार भाज्यांच्या माध्यमातून मिळावा यासाठी ३४ गावातील प्रत्येकी २ कुटुंबांना परसबाग प्रशिक्षण, बी – बियाणे, खते, रोपे इ. साहित्य देण्यात आले.

२. कुक्कुटपालन - २५ गावातील प्रत्येकी ५ कुटुंबांना २२ कोंबडीची पिल्ले व ती पिल्ले ठेवण्यासाठी खुराडे देण्यात आली. याबरोबर कुक्कुटपालन संदर्भात प्रशिक्षण दिले. कुक्कुटपालन हा दीर्घकालीन व्यवसाय व्हावा हा मुख्य उद्देश आहे.



३. शेळीपालन - १० गावातील प्रत्येकी २ कुटुंबांना २ शेळ्या देण्यात आल्या तसेच शेळी पालन विषयाचे प्रशिक्षण देऊन त्यांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यात आल्या. ४० शेळयांचा विमाही सेवावर्धिनीने काढला आहे.

४. आरोग्य जनजागृती – सर्व ३४ गावांमध्ये आरोग्य जनजागृती करण्यात आली. या अंतर्गत कोरोनापासून बचावाच्या उपायांचा संदेश असलेली भित्तीपत्रके प्रत्येक गावातील प्रमुख ५० ठिकाणी लावली. याबरोबर घरोघर जाऊन लोकांना स्वच्छतेचा संदेश दिला व आरोग्य तपासणीसाठी प्रवृत्त केले गेले.

५. आरोग्य तपासणी शिबीर - सर्व ३४ गावांत एक दिवसाचे मोफत आरोग्य तपासणी शिबीर घेतले. ज्यामधे रक्तगट तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी, आजारांवर मोफत औषधे व मार्गदर्शन केले गेले.




प्रत्येक गावात सरासरी १०० नागरिकांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घेतला.

६. शासकीय आरोग्य केंद्रांना वैद्यकीय उपकरणांची मदत – उस्मानाबाद व सांगली जिल्ह्यातील प्रत्येकी दोन शासकीय आरोग्य केंद्रांना रुग्ण तपासणीसाठी एक Multipara Monitor मशीन देण्यात आले.५ प्रकारच्या अद्ययावत तपासण्या या मशीनद्वारे होणार आहेत. ग्रामीण भागातील गरजू रुग्णांच्या तपासण्या / वैद्यकीय सुविधांसाठी याचा उपयोग होईल.



७. बायोगॅस - ३४ पैकी २० गावातील प्रत्येकी एका कुटुंबाला बायोगॅस प्लांट बसवून दिला आहे. बायोगॅसद्वारे इंधन खर्चाची बचत, खत निर्मिती आणि पर्यावरणाचे रक्षण असा तिहेरी हेतू यामागे आहे.

| उपक्रम | लाभार्थी संख्या |
|---|---|
| आरोग्य जनजागृती | ५,००० |
| आरोग्य तपासणी शिबीर | ३,०९४ |
| कुक्कुटपालन | १२५ कुटुंब |
| परसबाग | ६८ कुटुंब |
| बायोगॅस | २० कुटुंब |
| शेळी पालन | २० कुटुंब |
| ४ उपजीविका मिळून एकूण नागरिक<br>(सरासरी ४ जण एका घरात राहतात असे गृहीत धरून) | **९३२** |

# सरकारी आरोग्य आणि कल्याण केंद्रांचे मूल्यांकन

➢ प्रकल्पाचा उद्देश –

पुणे जिल्ह्यातील सरकारी आरोग्य आणि कल्याण केंद्रांचे मुल्यांकन करून अहवाल सादर करणे.



GRAAM



भारत सरकारच्या “आयुष्मान भारत” योजनेचे दोन प्रमुख भाग आहेत. त्यातील पहिला म्हणजे हेल्थ वेलनेस सेंटर. या अंतर्गत १ लाख ५० हजार प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राचे रूपांतर हेल्थ वेल्थ सेंटरमध्ये करण्यात येत आहे. योजनेचा दुसरा भाग हा देशातील वंचित कुटुंबांना द्वितीय व तृतीय श्रेणीच्या आरोग्यसेवेचं विमा कवच पुरवण्याचा विचार आहे. या योजनेअंतर्गत महाराष्ट्रात “आरोग्यवर्धिनी केंद्र” स्थापन करून सुविधा देण्यात येत आहेत.

या योजनेच्या अंमलबजावणीची देशभरात काय स्थिती आहे हे जाणून घेण्यासाठी भारत सरकारने म्हैसूर येथील “ग्राम” संस्थेला या प्रकल्पाच्या मूल्यांकनाचे काम सोपविले. ग्राम संस्थेने महाराष्ट्रात पुणे जिल्ह्यातील निवडक २१ केंद्रांमधे या प्रकल्पाचे काम करण्यासाठी स्थानिक सहयोगी संस्था म्हणून सेवावर्धिनीची निवड केली. या प्रकल्पातील कामाचे काही ठळक मुद्दे खाली दिले आहेत.

- प्रशिक्षण – या कामासाठी आवश्यक असलेले तांत्रिक प्रशिक्षण ग्राम संस्थेकडून २ जणांना Online स्वरुपात देण्यात आले. असेच २ दिवसांचे प्रशिक्षण सेवावार्धीनीच्या टिमला देण्यात आले.
- आरोग्य केंद्रांना भेट – या प्रकल्प कामासाठी ग्राम संस्थेने नेमून दिलेल्या २१ आरोग्य केंद्रांपैकी काही केंद्र ही पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील ३ तालुक्यात होती (दौंड, आंबेगाव व बारामती) आणि काही केंद्रे पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील निरनिराळ्या भागांमध्ये होती.
- ग्राम संस्थेने निर्धारित करून दिलेल्या app व निरनिराळ्या फॉर्म्सनुसार या सर्व केंद्रांची विस्तृत पाहणी सेवावर्धिनी टिमने केली.



- आरोग्य अधिकारी व लाभार्थी यांच्या मुलाखती – आरोग्य केंद्रांना प्रत्यक्ष भेट देऊन एकूण ३४ आरोग्य अधिकाऱ्यांच्या मुलाखती ध्वनिमुद्रित करण्यात आल्या. यामध्ये MO, CHO, ANM, Staff Nurse, MPW, Pharmacist, Lab Technician या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विस्तृत मुलाखती घेतल्या. या शिवाय १० आशाताईंच्या मुलाखती घेतल्या. एकूण २१० रुग्णांबरोबर गप्पा मारून त्यांच्याकडून केंद्राविषयीचे अभिप्राय जाणून घेतले.




## भटके विमुक्त सशक्तीकरण

दि. १ आणि २ जानेवारी २०२१ रोजी बार्शी आणि सोलापूर येथे उद्योजकता विकास प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.

सेवावर्धिनीच्या माध्यमातून गेल्या २ वर्षांपासून भटक्या विमुक्त समाजाच्या सक्षमीकरणाचा प्रकल्प चालवला जातो. कोविड १९ मुळे निर्माण झालेल्या बेरोजगारीची मोठी समस्या लक्षात घेऊन राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि सेवावर्धिनीच्या माध्यमातून स्वावलंबन अभियान सुरु केले आहे. या अभियानातून सोलापूर जिल्ह्यातील बार्शी आणि सोलापूर शहरात असणाऱ्या भटक्या समाजातील महिला, पुरुषांना उद्योजकता विकास प्रशिक्षणाचे आयोजन केले होते. यामध्ये कैकाडी, बहुरूपी आणि ओतारी समाजाचे महिला – पुरुष सहभागी झाले होते.

खादी ग्रामोद्योग आणि उद्योगवर्धिनी यांच्या सहयोगाने या वर्गाचे आयोजन केले होते.

- प्रशिक्षण वर्ग बार्शी – २ बचत गटातील २२ महिला लाभार्थी
- प्रशिक्षण वर्ग सोलापूर – ६ बचत गटातील ४४ महिला व पुरुष लाभार्थी







# कोविड १९ : मदतकार्य




किराणा कीट वाटप –




- १२ जिल्ह्यातील २० तालुक्यात ४१८८ कीट वाटप
- ५५ पेक्षा अधिक volunteers

जेवण डबा –


- यवतमाळ जिल्हा – २६ जणांना ३४ दिवस दोन वेळचे जेवण

## ‘कोविड १९’ जन सर्वेक्षण

शहरी भागातून कोविड १९ आणि lockdown चा परिणाम म्हणून मोठ्या प्रमाणात नागरिक आपापल्या मूळ गावी गेल्याचे लक्षात आले. हे स्थलांतर झाल्याची कारणे आणि त्याचे संभाव्य परिणाम याचा अभ्यास करण्यासाठी म्हणून दि. २७ एप्रिल ते ३० जून २०२० या कालावधीमध्ये ६२ सहयोगी संस्थांच्या बरोबर महाराष्ट्रामध्ये सर्वेक्षण करण्यात आले.
या सर्वेक्षणात महाराष्ट्रातील ३३ जिल्ह्यातील ५२०२ जणांची माहिती मिळवली.
सर्वेक्षणापूर्वी महाराष्ट्रातील निरनिराळ्या संस्थांची मनोभूमिका समजण्यासाठी आणि सर्वेक्षणानंतर आलेल्या निरीक्षणांवर चर्चा करण्यासाठी सर्व संस्थांबरोबर एकत्रित ३ संवाद बैठक झाल्या.
या सर्वेक्षणाचा परिणाम म्हणून प. महाराष्ट्राच्या ६ जिल्ह्यांमध्ये स्वावलंबन अभियानाची सुरुवात झाली.

सहयोगी संस्था -

- पूर्णम इको व्हिजन, पुणे
- रा. स्व. संघ जनकल्याण समिती पुणे, सोलापूर, नांदेड
- वनवासी कल्याण आश्रम, पुणे
- नीड, यवतमाळ
- संपूर्ण बांबू केंद्र, अमरावती
- केशवस्मृती प्रतिष्ठान, जळगाव
- अस्मिता अनाथ पालन बहुद्देशीय संस्था, सोलापूर
- अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, बीड
- श्री राधाकृष्ण महावीरप्रसाद पन्सारी ट्रस्ट, लोणावळा
- सेवा सहयोग, पुणे
- सेवा आरोग्य, पुणे
- विवेकानंद वैद्यक प्रतिष्ठान, सांगली
- अधिवक्ता परिषद, मुंबई
- सेवा इंटरनॅशनल, दिल्ली
- मशाल, पुणे
- श्री दत्त योगीराज बहुद्देशीय संस्था, नगर









# काळदरी खोरे समग्र विकास प्रकल्प

➢ प्रकल्पाचा उद्देश –

काळदरी खोऱ्यातील ७ गावांमध्ये शिक्षण, संस्कार, आरोग्य, रोजगार, जलसंधारण, संघटीत शेती व या विषयाला धरून काही विकास कामे करणे



रोटरी क्लब



काळदरी येथील ग्रामपंचायतीमध्ये ४ गावातील सरपंच, उपसरपंच, गावातील संस्थांचे प्रतिनिधी यांची ४ सप्टेंबर रोजी बैठक झाली. या बैठकीमध्ये आरोग्य व शिक्षण या विषयाला धरून पहिल्या वर्षभरात काम करण्याचे ठरले.

पानवडी येथे दि. ७ फेब्रुवारी २०२१ रोजी ७० महिलांची रक्त तपासणी व मासिक पाळी सुरु होऊन संपेपर्यंत विविध विषयांवर महिलांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला सासवडच्या डॉ. संध्या खळदकर उपस्थित होत्या.



संक्रातीचे वाण म्हणून काळदरी येथील श्री गणेशा महिला बचत गट यांनी तयार केलेल्या चिक्कीचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला रोटरी क्लब चे २० पेक्षा अधिक सदस्य उपस्थित होते.

मांढर येथे दिनांक १६/०२/२०२१ रोजी ५४ किशोरवयीन मुली व महिला यांची रक्त तपासणी करण्यात आली. वैद्य दीपाली पाटील यांनी महिला आणि मुलींना आहार कसा असावा, मासिक पाळीच्या काळात घेण्याची काळजी या विषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला गावच्या सरपंच व शाळेतील शिक्षिका उपस्थित होत्या.

काळदरी येथे श्री गणेशा महिला बचत गट २ वर्षापासून सेवावर्धिनी सोबत जोडलेला आहे. मागील वर्षी महिलांनी कुरडया तयार करून विक्री केली यामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढला. येथील कुक्कुटपालन या विषयावर प्रशिक्षण घेऊन व्यवसाय करण्याची तयारी दाखवली. या महिलांचा उत्साह पाहून रोटरी क्लब, शनिवारवाडाच्या कार्यकर्त्यांनी व्यवसायासाठी पिंजरे देण्याचे मान्य केले. सेवावर्धिनीच्या वर्धापन दिनाच्या दिवशी खराडवाडी ग्रामपंचायत काळदरी येथे पिंजरे वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला. बचत गटाच्या महिला अतिशय भारावून बोलत होत्या.

# आशा कि बूंदे

- प्रकल्पाचा उद्देश –


वर्षभर गावामध्ये स्वच्छ पिण्याचे पाणी पुरेसे उपलब्ध व्हावे यासाठी शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणे.



BRIDGESTONE

Bridgestone

या प्रकल्पात आंबेगाव तालुक्यातील १६ गावे व शिरूर तालुक्यातील – १७ गावांचा समावेश होता. ३३ गावांपैकी २६ गावांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवला.




कोविडच्या पार्श्वभूमीवर मार्च २०२० पासून गावामध्ये प्रत्यक्ष प्रवास होऊ शकला नाही, परंतु online बैठकीच्या माध्यमातून गावातील CRP (community resource person) यांच्याशी संवाद साधण्यात आला.

एकूण ६ सत्रांमधून गावातील पिण्याच्या पाण्याचे नियोजन, विहिरींची पाण्याची पातळी मोजणे , आपल्या भागात पडणारा पाऊस मोजणे अशा विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. या मार्गदर्शनासाठी ACWADAM, UNICEF या संस्थाची तज्ञ मंडळी उपस्थित होती. आंबेगाव येथील CRP यांचा इंटरनेट अभावी सहभाग कमी होता.

या भागातील ३ गावांच्या पेयजल शाश्वतता व सुरक्षितता आराखडा तयार करण्यात आला व त्याचा अहवाल सर्व गावांमध्ये वाटप करण्यात आला.

ACWADAM — सेवावर्धिनी — unicef

➤ प्रकल्पाचा उद्देश –

मावळ तालुक्यातील ३ ग्राम संकुलांमधील नागरिकांचे सक्षमीकरण



SASMT

उद्देश साध्य करण्यासाठी माध्यमे –

१. स्थानिक स्रोतांमधून रोजगाराच्या संधी शोधणे त्यासाठी प्रत्यक्ष काम करणे
२. बचत गट स्थापन करणे / पुनरुज्जीवित करणे
३. नागरिकांच्या आरोग्याचे प्रश्न समजून घेणे व उपाययोजना करणे

<u>या प्रकल्पासाठी ३१ गावातील ६८ वाड्या – वस्त्यांची निवड केली</u>.

- पहिल्या टप्प्यात काही गावांमध्ये जाऊन अंगणवाडी सेविका, प्राथमिक शिक्षक, आशा वर्कर यांच्या भेटी घेऊन गावांमधील माहिती मिळवली. या माहितीवरून गावाचे सर्वेक्षण करणे आणि एका गावात स्व अध्ययन केंद्र सुरु करणे अशी कामे ठरली.
- त्यानुसार अंदरमावळ आणि पवन मावळ परिसरात एकूण ६६ वाड्या – वस्त्यांचे प्राथमिक सर्वेक्षण केले.



- २६ जानेवारी रोजी केवरे – चावसर ग्रामपंचायतीमध्ये ३० विद्यार्थ्यांसाठी स्व – अध्ययन केंद्र सुरु झाले.
- १० वस्त्यांमध्ये आरोग्य रक्षकांची नेमणूक केली, त्यांना आरोग्य विषयक प्राथमिक प्रशिक्षण दिले.
- चावसर येथे आरोग्य उपकेंद्राच्या OPD ची सुरुवात झाली.
- चावसर येथे वन हक्क समिती स्थापन केली आणि त्याबाबतचे प्रशिक्षण स्थानिक नागरिकांना देण्यात आले.






# सेवा दिवाळी

➢ उद्देश –

कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर दिवाळीनिमित्त किराणा कीट वाटप

सेवावर्धिनीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील अनेक गावात सामाजिक कामे सुरु आहेत. याद्वारे समाजातील सर्व स्तरावर संपर्क होत असतो. गावात काम करत असताना अनेक गरीब कुटुंबांशी संपर्क होतो. यातून निवडक अंत्यंत गरजू कुटुंबांना मदत देण्याचे ठरले. त्याप्रमाणे लाभार्थी यादी बनवून त्या लाभार्थ्यांना दिवाळीच्या आदल्या दिवशी किराणा कीट आणि दिवाळीसाठी लागणारे जिन्नस देण्यात आले.






याशिवाय 'पुरंदर नॅचरल' शेतकरी गटाने 'सेवा दिवाळी २०२०' या उपक्रमात ३० किलो फराळ उपलब्ध करून दिला होता. दि. १२ नोव्हेंबरला मिळालेला हा दिवाळी फराळ पुरंदर तालुक्यातील काळदरी खोऱ्यातील पानवाडी, बहिरवाडी, काळदरी या गावांमध्ये देऊन दिवाळी शुभेच्छा देण्यात आल्या.

## "एक दिवा पूर्वजांसाठी"



पुणे येथील वैकुंठ परिवार, सर्वमंगल प्रतिष्ठान, सेवावर्धिनी, यमगरवाडी मित्र मंडळ यांच्या माध्यमातून "एक दिवा पूर्वजांसाठी" या संकल्पनेतून वैकुंठ स्मशानभूमीत दीपोत्सव साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात "भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान" ला **पालावरची शाळा** या उपक्रमासाठी रु. २०,०००/- दिले. तसेच स्मशानात राहून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कारही यावेळी करण्यात आला.

या कार्यक्रमात पुणे महानगराचे प्रथम नागरिक महापौर मुरलीधर मोहोळ, भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानच्या शुभांगी तांबट, सेवावर्धिनीचे कार्यवाह सोमदत्त पटवर्धन आदी मान्यवर उपस्थित होते.

# सेवावर्धिनी – तांत्रिक तपशील

| Sr. No. | Particulars | Details |
|---|---|---|
| 1 | Name of Institution | Sevavardhini |
| 2 | Postal Address | 417, Mahaganga, Narayan Peth,<br>Rashtra Bhasha Bhavan Lane, PUNE - 411 030 Maharashtra- India |
| | Permanent Address | 390B, Narayan Peth, Dattadham, Rashtrabhasha Bhavan Lane, Pune, 411030 |
| 3 | Phone: Landline<br>Mobile | 020-24499606<br>9423580535 |
| 4 | E-mail Id.<br>Web site | ceo@sevavardhini.org<br>www.sevavardhini.org |
| 5 | Registration: SRA<br>BPTA | 1624/1997GBBSD DT/- 26/11/97<br>F-19925(Mumbai) Dt/- 17/03/98 |
| 6 | 80G of IT Act | AAGTS8729NF20214 (Provisional) |
| 7 | PAN | AAGTS8729N |
| 8 | Registration under Foreign Contribution (Regulation) Act, 2010. (FCRA) | Registration Number: 083930709<br>Nature: Social |
| 9 | Bank Details (Inland) | Bank Name – Janata Sahakari Bank Ltd. Pune<br>Branch – Shanivar Narayan Peth Branch<br>A/c No. – 015220100024504<br>A/c type – Saving Account<br>IFSC – JSBP0000015 |
| 10 | Bank Details (FCRA) | Bank Name – State Bank of India<br>Branch – New Delhi Main Branch<br>A/c No. – 40133392317<br>A/c type – FCRA current account<br>Branch Code - 00691<br>IFSC – SBIN0000691<br>SWIFT Code – SBININBB104 |